कोल्हापूर जिल्हयात हत्ती या वन्यप्राण्यामुळे शेतीचे होणारे नुकसान टाळण्याकरिता उपाययोजना सुचविणेसाठी समितीची स्थापना.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग,
शासन आदेश क्रमांक डब्ल्युएलपी-०३१८/प्र.क्र.८७ (भाग-१)/फ-१
मंत्रालय मुंबई, ४०० ०३२
दिनांक:- १९ मार्च, २०१८

प्रस्तावना :-

कोल्हापूर जिल्हयातील आजरा, भुदरगड, राधानगरी, आजरा तालुक्यामध्ये वन्यहत्ती याप्राण्यांमुळे शेती व मालमत्तेचे नुकसान होते. वन्यप्राण्यांपासून होणा-या मनुष्यहानी, पशुधन हानी तसेच शेतपीक फळझाडे नुकसान भरपाई अदा करण्याचे अनुषंगाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये काही सुधारणा करणे गरजेचे आहे असा मुद्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिनांक १६.०३.२०१८ रोजी विधानमंडळाचे सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी उपस्थीत केला. त्याअनुषंगाने विधानमंडळात लक्षवेधीचे चर्चे दरम्यान मा.मंत्री (वने) महोदयांनी प्रकरणी समिती गठीत करण्याचे विधानमंडळात आश्वासन दिले आहे. सदर आश्वासन पुर्तीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

शासन आदेश :-

कोल्हापूर जिल्हयातील प्रामुख्याने आजरा, भुदरगड, राधानगरी, चंदगड, या तालुक्यामध्ये वन्यहत्ती याप्राण्यांमुळे शेती व मालमत्तेचे नुकसान होते त्याअनुषंगाने प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी खालील प्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे :-

१.	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	:- अध्यक्ष
२.	मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर	:- सदस्य
३.	मा. श्रीमती. संध्यादेवी देसाई-कुपेकर, विधान सभा सदस्य.	:- सदस्य
४.	मा. श्री. प्रकाश आंबिटकर, विधान सभा सदस्य.	:- सदस्य
५.	उप वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	:- सदस्य सदस्य

२. सदर समितीची कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील :-

१. कोल्हापूर जिल्हयात वन्यहत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी प्रतीबंधात्मक उपाययोजना सुचविणे.
२. वन्यप्राण्यांपासून होणा-या नुकसानी करीता देण्यात येत असलेल्या अर्थसहाय्य संदर्भात प्रचलीत शासन निर्णयात सुधारणा सुचविणे.

३. उपरोक्तप्रमाणे गठीत समितीने कोल्हापूर जिल्हयातील वन्यहत्ती मुळे होणारे नुकसानीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन समितीचा अहवाल १ महिन्याचे कालावधीत शासनाला सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१९१७४८०८३११९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.19 17:51:14 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. मा. मंत्री (वित्त आणी नियोजन, वने) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मा. श्रीमती. संध्यादेवी देसाई-कुपेकर, विधान सभा सदस्य.
५. मा. श्री. प्रकाश आंबिटकर, विधान सभा सदस्य.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर
८. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर
९. उप वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर.
१०.फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई /निवड नस्ती.